# मेट्रो ३ मार्गाच्या विमानतळ रेल्वे स्थानकात देशातील सर्वांत मोठा सरकता जिना

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा -वांद्रे- सिप्झ मेट्रो ३ मार्गाची स्थानके अत्यंत नावीन्यपूर्ण पद्धतीने उभारण्याचे काम सुरू आहेत. अनेक नावीन्यांपैकी एक नावीन्य छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी -२ स्थानकात पाहायला मिळणार आहे. या स्थानकात भारतातील सर्वात मोठ्या उंचीचे सरकते जीने बसवण्यात येत आहेत. एवढ्या उंचीचे सरकते जीने कोणत्याही स्थानकात नाहीत.

या स्थानकात सर्वाधिक आठ जीने बसवण्यात येणार आहेत. त्यापैकी चार जीने बसवण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित जीने बसवण्याचे काम सुरू आहे. ही जीने बसवण्यासाठी तब्बल २५० टन वजनाच्या क्रेनचा वापर करण्यात येत आहे. हे जीने १९.१५ मीटर ऊंचीचे आहेत. हे स्थानक या मार्गातील एक महत्वाचे स्थानक आहे. विमानतळावर जाण्यासाठी अनेकजण मेट्रो ३ चा वापर करतील, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे या स्थानकावर वर्दळ अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता स्थानकात प्रवेश करणे, स्थानकाबाहेर पडणे, फलाटावर प्रवेश करणे आदि प्रक्रिया सुलभ असाव्यात यावर लक्ष पुरवण्यात येत आहे. जास्त उंचीचा सरकता जिना बसवल्यामुळे जास्तीत जास्त प्रवासी सामावून घेणे शक्य होणार आहे.